# मराठी भाषेचा शाश्वत विकास

**डॉ. शुभदा जवाहर उपासे - शिवपूजे**
मराठी विभाग प्रमुख, व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर
E Mail : shubhada.upase@gmail.com
Mo.8805746201

अमृतातेही पैजा जिंकणा-या आणि भाषामाजी भाषा साजरी असणा-या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. मराठी भाषेची प्राचीनता, भाषेची मौलिकता आणि सलगता, भाषिक आणि वाङ्यीन परंपरेचे स्वयंभूपण, प्राचीन भाषा व तिचे आधुनिक रुप यांच्यात पडू शकणा-या खंडासह जोडलेले नाते, या चार मुद्द्यांच्या अनुषंगाने विचार करुन हा अभिजात दर्जा मिळाला आहे. आता या टप्प्यानंतर मराठी भाषेच्या शाश्वत विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. प्राचीन महारठ्ठी भाषा, मरहठ्ठी भाषा, महाराष्ट्री प्राकृत भाषा, अपभ्रंश मराठी भाषा आणि आजची मराठी भाषा असा मराठी भाषेचा प्रवास झालेला आहे. या वेगवेगळ्या भाषा नसून ती मराठी या एकाच भाषेची विविध रुपे आहेत. लीळाचरित्र, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी हे मराठीतील आद्यग्रंथ नसून मराठी प्रगल्भ व श्रीमंत झाल्यानंतरचे श्रेष्ठ ग्रंथ आहेत. त्याच्या आधी बारा ते पंधराशे वर्षे अत्यंत समृद्ध भाषा होती याचे शिलालेख, ताम्रपट, पोथ्या आणि हस्तलिखीत ग्रांथिक पुरावे उपलब्ध आहेत. मराठीतला आज उपलब्ध असलेला पहिला मराठी ग्रंथ ' गाथासप्तशती ' सुमारे दोन हजार वर्षे जुना आहे. अशा या प्राचीन भाषेला शाश्वत ठेवणे गरजेचे आहे.

विविध संस्कृतीच्या सान्निध्यातून मराठी भाषेने समन्वयशील वृत्तीने आजवर मोठी शब्दसंपदा जमा केली आहे. त्यात इंग्रजी, अरबी, फारसी अशा परकीय भाषांबरोबरच कन्नड, तेलुगु, तमीळ अशा इतर भारतीय भाषाही आहेत. अशा मराठी भाषेचा शाश्वत विकास हा एक महत्त्वाचा विषय आहे, ज्यावर विचार केल्यास अनेक मुद्दे समोर येतात. मराठी भाषा भारताच्या महाराष्ट्र राज्याची मुख्य भाषा असून देशाच्या स्तरावर बोलणा-यांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. तिची सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्वपूर्णता मोठी आहे. मराठी भाषेचा शाश्वत विकास साधण्यासाठी अनेक प्रयत्न विविध करणे आवश्यक आहे. काही महत्त्वाचे मुद्दे आणि उपाय केले जाऊ शकतात :

१) **शिक्षणाचा विस्तार करणे** : मराठी भाषेतील शिक्षणाची गती वाढवली पाहिजे. विविध शैक्षणिक अशा शालेय, महाविद्यालयीन आणि विद्यापीठ स्तरावर मराठी भाषेतील शैक्षणिक साहित्याचा विकास करणे आवश्यक आहे. नवीन पिढीला मराठीतून चांगले

ज्ञान मिळावे यासाठी विज्ञान, गणित, तंत्रज्ञान, आणि इतर विषयांवर मराठीतून पुस्तकं आणि शैक्षणिक सामग्री उपलब्ध करणे आवश्यक आहे.

२) **मराठी माध्यमाच्या शाळांची वाढ करणे** : मराठी माध्यमातील शाळांचे प्रमाण वाढवणे तसेच इंग्रजी किंवा इतर माध्यमांच्या तुलनेत त्यांना समान संधी देणे आवश्यक आहे. यामुळे विद्यार्थ्यांना मराठीतून चांगली ज्ञानवृद्धी साधता येईल आणि तेच विद्यार्थी आपोआपच आपल्या सांस्कृतिक ठेव्याशी जोडले जातील.

३) **संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे** : भारतीय तसेच महाराष्ट्रीय संस्कृतीशी निगडीत मराठी साहित्य, नाटक, संगीत, चित्रपट आणि कला या सर्व गोष्टींचा प्रचार केला पाहिजे. मराठी भाषेतील काव्य, शास्त्रीय संगीत, नृत्य वगैरेंचा जागतिक स्तरावर प्रचार करण्यासाठी विविध उपक्रम राबवले गेले पाहिजेत.

४) **डिजिटल माध्यमांमध्ये योगदान गरजेचे** : आजच्या डिजिटल युगात मराठी भाषेचा वापर वाढवण्यासाठी, आंतरजालावरील ( इंटरनेटवरील ) उपलब्ध मराठी सामग्रीचा सुसंगत आणि गुणवत्ता असलेला विकास होणे गरजेचे आहे. यामध्ये विविध मराठी ब्लॉग, पॉडकास्ट, वेबसाईट्स तसेच सोशल मीडिया या माध्यमांचा उपयोग करता येऊ शकतो.

५) **उद्योजकता आणि नवकल्पना** : मराठी भाषेतील उद्योजकतेला चालना देणारे आणि त्यात नवीन विचार आणणारे उपक्रम सुरू करणे महत्वाचे आहे. मराठीतून सुरू होणारे स्टार्टअप्स, सॉफ्टवेअर आणि इतर तंत्रज्ञान व्यवसाय इतर अशा हिंदी, इंग्रजीच्या तुलनेत अधिक प्रमाणात वाढवता येऊ शकतात.

६) **भाषिक अस्मिता आणि सन्मान जपणे** : मराठी भाषेचा गर्व आणि आदर जपण्यासाठी भाषा सन्मानाचे, अस्मितेचे महत्त्व वाढवले पाहिजे. भाषिक अधिकारांचा सन्मान आणि योग्य वापर कसा करावा यावर चर्चा होण्याची आवश्यकता आहे.

७) **सरकार आणि संस्थांचे योगदान आवश्यक** : सरकार आणि इतर संस्थांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी योग्य कार्यवाही करणे आवश्यक आहे. यामध्ये मराठी ही व्यवहारीक उपयोगात येण्यासाठी मराठी भाषेतील सरकारी कामकाज, न्यायालयीन प्रक्रिया आणि सार्वजनिक संवादाची भाषा म्हणून मराठीचा वापर वाढवणे गरजेचे आहे.

आजच्या काळात प्रसार माध्यमांमुळे भाषेचे स्वरुप बदलत चाललेले आहे. माध्यमांमुळे, इंग्रजी भाषेच्या आक्रमणामुळे, इमोजीचा प्रभाव वाढत चालल्यामुळे भाषेचे लिखीत स्वरुप बदलत चाललेले आहे. मराठीची लिपी जी देवनागरी आहे त्यामध्ये बदल झालेला असून तिचा वापर करणा-यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. या बाबतीत काटेकोरपणे जाणीवपूर्वक लक्ष देऊन अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. सामान्य नागरिकांनी जागरुकतेने आपली मातृभाषा, राजभाषा शाश्वत टिकविण्यासाठी प्रयत्नशील राहणे गरजेचे आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे पुस्तक निर्मिती, वितरण, दस्तावेजीकरण, संदर्भशोधन यात स्तुत्य बदल होतील. ' ई ' साहित्यसंमेलन होत आहेत, विश्वसाहित्यसंमेलने सुरू झाली आहेत. आयपॅड, मोबाईलवर पुस्तक

वाचनाची सोय, पुस्तकांच्या चित्रफिती, ध्वनिफिती यातून वाङ्मय नवीन पिढीपर्यंत पोहोचण्यास सुलभ झाले आहे.

मराठी भाषेची आणि साहित्याची श्रेष्ठता स्वयंसिद्ध आहे. मराठीतील वैचारिक साहित्य, इतिहास संशोधन, कोशवाङ्मय, नाटक, विनोद, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, ग्रामीण साहित्य आदी दालने समृद्ध आहेत. अनेक मौलिक ग्रंथ या भाषेत आहेत. तिची थोरवी गावी तितकी कमी आहे. आज मराठी समोर अनेक आक्रमणे, अतिक्रमणे, आव्हाने आहेत ; पण मराठी भाषकांनी जर न्युनगंड सोडून मराठीचा आग्रह धरला तर मराठीचा शाश्वत राहील व तिचा विकास होईल. समृद्ध वाङ्मयीन परंपरा असलेल्या मराठी भाषेचा वारसा पेलणारी नवीन सक्षम पिढी तयार करण्यासाठी अनेक शासकीय धोरणांची कास धरावी लागणार आहे. सरकार आणि समाजाने हातात हात घालून मराठीच्या विकासासाठी कटिबद्ध व्हायला हवे. याप्रमाणे, मराठी भाषेचा शाश्वत विकास साधण्यासाठी विविध पातळ्यांवर कार्य करण्याची आवश्यकता आहे. फक्त सरकारी किंवा शैक्षणिक स्तरावरच नाही तर समाजाच्या सर्व स्तरावर मराठी भाषा जपण्यासाठी आणि तिच्या लोकप्रियतेसाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

निष्कर्ष : प्राचीन अशा मराठी भाषेला शाश्वत ठेवणे गरजेचे आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाल्याने ती टिकवणे, तिचा शाश्वत विकास करणे साध्य होणार आहे. सर्वसामान्य जनता व शासन या दोघांच्याही सहकार्याने मराठी भाषा ही शाश्वत राहील. यासाठी सर्व स्तरावर, पातळ्यांवर प्रयत्न होणे गरजेचे आहे. मराठी भाषेच्या शाश्वततेसाठी विविध उपाययोजना करता येऊ शकतात. **शिक्षणाचा विस्तार करणे, मराठी माध्यमाच्या शाळांची वाढ करणे, संस्कृतीचा प्रचार आणि प्रसार करणे, डिजिटल माध्यमांमध्ये योगदान गरजेचे, उद्योजकता आणि नवकल्पना, भाषिक अस्मिता आणि सन्मान जपणे, सरकार आणि संस्थांचे योगदान आवश्यक या मुद्द्यांच्या आधारे उपाययोजनांचा विचार करता येऊ शकतो.**

संदर्भ :

१) भाषाप्रकाश - डॉ. नीलिमा गुंडी
२) माझा मराठीचा बोलु कौतुके - संपा : यशवंत पाटणे
३) भारतीय भाषांचे लोकसर्वेक्षण: महाराष्ट्र - संपा : अरुण जाखडे
४) भाषाविचार - ना.गो.कालेलकर
५) आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास ( खंड, २ ) - अ.ना.देशपांडे
६) मराठी भाषा स्वरुप आणि उपयोजन - यशवंत कानेटकर